महाआयटीमध्ये कार्यरत सर्व कर्मचारीवृंदास,

सस्नेह नमस्कार.

मराठी भाषेला लाभलेला अभिजात भाषेचा दर्जा आणि महाराष्ट्र राज्याच्या मराठी भाषा धोरणाच्या मसुद्याला राज्य मंत्रिमंडळाने दिलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने तसेच ३ फेब्रुवारी २०२५ रोजी नियोजन विभागाद्वारे जारी शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-४०२४/प्र.क्र.४२८/का.१४२१ ला अनुसरून कार्यालयीन कामकाजात मराठी भाषेला प्रोत्साहन देण्याचा निर्णय महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ मर्यादित – महाआयटीने घेतला आहे. त्यानुसार कार्यालयीन पत्रव्यवहारासाठी तसेच कार्यालयात परस्परांशी संवाद साधताना मराठी भाषेचा जास्तीत जास्त वापर करावा आणि आपल्या या अभिजात भाषेचे जतन करण्याचे कर्तव्य पार पाडावे.

मराठी भाषेचे जतन आणि संवर्धन करण्याच्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून आपल्या कार्यालयाच्या दर्शनी भागातील फलकावर आपल्या रोजच्या वापरातील दोन इंग्रजी शब्द आणि त्यांचे मराठी प्रतिशब्द प्रदर्शित केले जातील. आपण या शब्दसंपदेचा दैनंदिन कामकाजात अवश्य वापर करावा. या उपक्रमात काही शब्दांचा समावेश करण्याची सूचना देण्यास आपण इच्छुक असलात तर त्यासाठी madhuri.pange@mahait.org या ईमेल आयडीवर सदर इंग्रजी/मराठी शब्द पाठवावा. मराठी भाषेचा कार्यालयीन कामकाजात वापर वाढविण्यासाठी आपल्या काही सूचना असतील, तर त्यांचेही स्वागत आहे.

सदिच्छांसह,<br>
अजय गादिया<br>
मुख्य परिचालन अधिकारी, महाआयटी